नि.फौ.प्र.क्र.११६/२०१७ निशाणी क्र.९१

**<u>फौजदारी प्रक्रिया संहिता, १९७३ मधील कलम ३१३ अन्वये आरोपीचे निवेदन</u>**

नाव- प्रतिभा मयूर नवले वय -२७ वर्षे

राहणार – लिंगदेव, तालुका अकोले, जि. अहमदनगर

प्र.१ तुम्हाला विचारण्यात येणा–या प्रश्नांची उत्तरे देण्यास तुम्ही बांधील नाही, जर प्रश्नाचे उत्तर चुकले तर त्यासाठी तुम्हाला कोणतीही शिक्षा होणार नाही, पण तुम्ही दिलेली उत्तरे ही विचारात घेतली जातील, हे समजले काय ?

उत्तर होय.

प्र.२ साक्षीदार क्र.१ प्रियंका सचिन नवले यांच्या पुराव्यात असे आले आहे की, त्यांचे लग्न त्यांचे आई–वडिलांनी करून दिले होते व लग्नात संसारोपयोगी साहित्य तसेच सोन्याचे दागिने घातले होते, याबाबत तुमचे काय म्हणणे आहे ?

उत्तर खोटे आहे

प्र.३ यापुढे त्यांच्या पुराव्यात असे आले आहे की, लग्नानंतर त्या सासरी एक वर्ष राहिल्या. त्या दरम्यान तुम्ही त्यांचेशी निट वागत नव्हता. तुम्ही त्यांना टोचून बोलत होता. लग्नानंतर सव्वा महिन्यात त्या व तुम्हा पैकी आरोपी क्र.१ असे मोटारसायकलवरून अकोलेहून संगमनेरला जात असताना तुम्ही आरोपी क्र.१ ने दारू पिवून गाडी चालवल्यामुळे त्यांचा अपघात झाला होता, याबाबत तुमचे काय म्हणणे आहे ?

उत्तर खोटे आहे.

प्र.४ यापुढे त्यांच्या पुराव्यात असे आले आहे की, त्या अपघातात तुम्हा दोघांना दुखापत झाली होती. त्यावेळी दोन महिने उपचार घेतले होते. त्यावेळी तुम्ही त्यांना तुझे माहेरहून उपचाराचा खर्च भागविण्यासाठी पैसे घेवून ये, असे त्यांना सांगितले होते, याबाबत तुमचे काय म्हणणे आहे ?

उत्तर खोटे आहे

प्र.५ यापुढे त्यांच्या पुराव्यात असे आले आहे की, त्यावेळी त्यांचे आईने पन्नास हजार रुपयें तुम्हाला दिले होते. त्यानंतर उपचार संपवून घरी गेल्यानंतर तुम्ही जमीन घ्यायची आहे म्हणून माहेरहून चार ते पाच लाख रुपये घेवून ये, अशी मागणी केली. त्यांचे वडिलांची पैसे देण्याची परिस्थिती नसल्यामुळे ते पैसे देवू शकले नाही. दरम्यान त्यांचे दागिने चोरीला गेले. पैसे न दिल्यामुळे तुम्ही त्यांना त्रास देण्यास सुरुवात केली, याबाबत तुमचे काय म्हणणे आहे ?

उत्तर खोटे आहे.

प्र.६ यापुढे त्यांच्या पुराव्यात असे आले आहे की, तुम्ही त्यांचेकरिता आंभोळ येथे दवाखाना टाकलेला असताना देखील तुम्ही त्यांना दवाखान्यात न जाता शेतात काम कर, असे सांगत होता. त्यांनी शेतात काम केले नाही तर ते तुम्हा पैकी आरोपी क्र.१ चे दुसरे लग्न लावून देतील, अशी धमकी तुम्ही त्यांना देत होता, याबाबत तुमचे काय म्हणणे आहे ?

उत्तर खोटे आहे

प्र.७ यापुढे त्यांच्या पुराव्यात असे आले आहे की, दरम्यानचे काळात त्या गरोदर राहील्या होत्या. त्या गरोदर असताना तुम्ही त्यांना त्रास दिल्यामुळे त्यांची मानसिक व शारीरिक परिस्थिती ढासळली होती. तुम्ही त्यांना बाळंतपणासाठी तुझे माहेरी जा, असे सांगत होता. परंतु, त्यांची माहेरची परिस्थिती नसल्यामुळे त्या तुम्हाला विनंती करून

सासरीच थांबल्या. तदनंतर त्यांची प्रकृती गंभीर असताना नाशिक येथे त्यांचे बाळंतपण झाले व त्यांना मूलगी झाली, याबाबत तुमचे काय म्हणणे आहे ?

उत्तर खोटे आहे

प्र.८ यापुढे त्यांच्या पुराव्यात असे आले आहे की, तदनंतर तुम्ही त्यांना भेटण्यास गेला नाहीत. तसेच, त्यांचेकडे पूर्णपणे दुर्लक्ष केले. त्यांनी बाळंतपणाचे नाशिक येथील दवाखान्यात अतिदक्षता विभागात पंधरा दिवस उपचार घेतले. त्यावेळी तुम्ही त्यांचे आईला तेथे बोलावून घेतले व दवाखान्याचा खर्च करण्यास सांगितले. मुलीची प्रकृती ठिक नसल्यामुळे त्यांचे आईने तुमच्याकडेच त्यांना ठेवण्यास विनंती केली. त्यानंतर त्या त्यांच्या मुलीला घेवून उपचाराकामी संगमनेर येथे एक महिना राहिल्या होत्या. तेथे तुम्ही त्यांच्याकडे लक्ष न दिल्यामुळे त्यांच्या आईने त्यांच्या भावाला बोलावून त्यांना माहेरी नेले, याबाबत तुमचे काय म्हणणे आहे ?

उत्तर खोटे आहे.

प्र.९ यापुढे त्यांच्या पुराव्यात असे आले आहे की, त्या माहेरी असताना तुम्ही त्यांचेशी कोणताही संपर्क केला नाही व अचानक त्यांना नांदायला येण्याची नोटीस पाठवली. सदर नोटीशीस उत्तर देवून त्या पुन्हा नांदण्यास आल्या तरी तुम्ही त्यांना त्रास देत होता. तुम्ही त्यांना नांदवणार नाही असे म्हणत होता. त्यावेळी त्यांच्या आईने तुम्हाला विनवणी केली असता तुम्ही त्यांच्या भावाच्या को–या कागदावर सहया घेतल्या, याबाबत तुमचे काय म्हणणे आहे ?

उत्तर खोटे आहे

प्र.१० यापुढे त्यांच्या पुराव्यात असे आले आहे की, त्यानंतर देखील तुम्ही त्यांचेकडे व मुलीकडे निट लक्ष देत नव्हता. तुम्ही त्यांना घालूनपाडून बोलत होता. तुम्ही त्यांना उपाशीपोटी देखील ठेवले होते. मुलीकडे पाहून त्या तुमच्या वागण्यात सुधारणा होईल अशी अपेक्षा ठेवून त्यांनी तुमच्या त्रासाकडे दुर्लक्ष केले. परंतु, तुमचे वागण्यात सुधारणा झाली नाही. तुम्ही त्यांना सतत शिवीगाळ करून तू माहेरी निघून जा, असे सांगत होता. अडीच ते तीन महिने झाल्यानंतर त्यांना त्रास असह्य झाल्यामुळे त्या सन २०१७ मध्ये माहेरी आल्या, याबाबत तुमचे काय म्हणणे आहे ?

उत्तर खोटे आहे

प्र.११ यापुढे त्यांच्या पुराव्यात असे आले आहे की, पाथर्डी येथे समुपदेशन केंद्रात जाऊन त्यांनी निशाणी ६४ वरील तक्रारी अर्ज दिला. तुम्ही समुपदेशन केंद्रात हजर न झाल्यामुळे त्यांना पोलीस ठाण्यात तक्रार देण्यास सांगण्यात आले. त्यानंतर त्यांनी पाथर्डी पोलीस ठाणे येथे जावून तुमचे विरुध्द निशाणी ६५ वरील फिर्याद दिली. ती फिर्याद अकोले पोलीस ठाण्यात वर्ग करण्यात आली. तपासादरम्यान त्यांनी लग्नाचे फोटो तपासी अधिकारी यांच्याकडे दिले होते, याबाबत तुमचे काय म्हणणे आहे ?

उत्तर खोटे आहे

प्र.१२ साक्षीदार क्र.२ सुभद्रा नवनाथ बर्डे यांच्या पुराव्यात असे आले आहे की, सदर लग्न त्यांनी करून दिले होते. लग्नात संसारोपयोगी साहित्य तसेच सोन्याचे दागिने घातले होते, याबाबत तुमचे काय म्हणणे आहे ?

उत्तर खोटे आहे.

प्र.१३ यापुढे त्यांच्या पुराव्यात असे आले आहे की, लग्नानंतर एका महिन्याचे आत तुम्हा पैकी आरोपी क्र.१ ने दारू पिवून त्यांच्या मुलीचा अपघात केला होता व त्यावेळी ती संगमनेर येथे उपचार घेत होती. औषधोपचारासाठी तुम्ही त्यांच्याकडे पन्नास हजार रूपये मागितले. त्यांनी ते दिले होते. उपचारानंतर त्यांची मुलगी सासरी लिंगदेव येथे गेली. तुम्ही तिला सासरी शेतातील काम करण्यास सांगत होता व तिचा शारिरीक व मानसिक छळ करत होता. तुम्ही तिला एकटे पाडत होता. तुम्ही जमीन खरेदी करण्यासाठी माहेरून पैसे घेवून ये, असे म्हणून तिला त्रास देत होता, याबाबत तुमचे काय म्हणणे आहे ?

उत्तर खोटे आहे.

प्र.१४ यापुढे त्यांच्या पुराव्यात असे आले आहे की, दरम्यानचे काळात त्यांची मुलगी गरोदर असताना तिची शारिरीक परिस्थिती ढासळली होती. त्यामुळे, तिला नाशिक येथील दवाखान्यात दाखल केले होते. तेथे तिचे बाळंतपण झाले व तिला मुलगी झाली. सदर दवाखान्याचा खर्च देखील त्यांनी केला होता. ती परत सासरी गेल्यानंतर तिचा छळ तुम्ही चालूच ठेवला. त्यामुळे त्यांनी तिला माहेरी आणले, याबाबत तुमचे काय म्हणणे आहे ?

उत्तर खोटे आहे.

प्र.१५ यापुढे त्यांच्या पुराव्यात असे आले आहे की, त्यांच्या मुलीची मुलगी नेहमी आजारी असल्यामुळे तिचा दवाखाना करावा लागत होता. परंतु, तुम्ही कधीही त्याकडे लक्ष दिले नाही. उलट तुम्ही त्यांची मुलगी नांदत नाही म्हणून नोटीस पाठवली होती. सदर नोटीस पाठविल्यानंतर ते मुलीला सासरी घेवून गेले. परंतु, तुम्ही तिला ठेवून घेण्यास नकार देत होता. ते मुलीला सासरी घेवून गेले, तेव्हा तुम्ही त्यांच्या मुलाच्या को–

या कागदावर सहया घेतल्या होत्या व मुलीला ठेवून घेतले, याबाबत तुमचे काय म्हणणे आहे ?

उत्तर खोटे आहे.

प्र.१६ यापुढे त्यांच्या पुराव्यात असे आले आहे की, त्यानंतर तुम्ही पुन्हा तिचा छळ चालू केला. तुम्ही तिला उपाशीपोटी ठेवत होता. तसेच, लहान मुलीकडे लक्ष देत नव्हता. फिर्यादी दोन ते तीन महिने कशीबशी नांदली. परंतु, तिला जास्त त्रास होवू लागल्यामुळे त्यांनी तिला माहेरी आणले. त्यांच्या मुलीने समुपदेशन केंद्रात तक्रार दिल्यानंतर तुम्ही तेथे आला नाहीत, याबाबत तुमचे काय म्हणणे आहे ?

उत्तर खोटे आहे.

प्र.१७ साक्षीदार क्र.३ जबीर अन्वरअली सय्यद यांच्या पुराव्यात असे आले आहे की, दिनांक २६.०७.२०१७ रोजी ते अकोले पोलीस स्टेशन येथे पोलीस हेड कॉस्टेबल म्हणून कार्यरत होते. सदरच्या दिवशी वरिष्ठांच्या लेखी आदेशान्वये त्यांच्याकडे गु.र.नं.१०६/२०१७ या केसचा तपास सोपवण्यात आला होता. सदरचा गुन्ह्याबाबत प्रथम गुन्हा हा पाथर्डी पोलीस स्टेशन येथे झिरो नंबरने दाखल झाला होता. त्याबाबतचे कागदपत्र अभिलेखावर आहेत, याबाबत तुमचे काय म्हणणे आहे ?

उत्तर खोटे आहे.

प्र.१८ यापुढे त्यांच्या पुराव्यात असे आले आहे की, सदरील गुन्ह्याचा तपास करत असताना त्यांनी साक्षीदारांचे जबाब नोंदविले व त्यांना असे निष्पन्न झाले की, तुम्ही सर्वांनी संगनमत करून फिर्यादीचा मानसिक व शारिरीक छळ केला व जमीन घेण्यासाठी पैशाची मागणी केली व पुरेसा पुरावा मिळून आल्याने त्यांनी नियमानुसार तुमच्याविरुध्द न्यायालयात दोषारोपपत्र दाखल केले, याबाबत तुमचे काय म्हणणे आहे ?

उत्तर खोटे आहे.

प्र.१९ तुम्हाला शपथेवर जबाब द्यायचे आहेत काय ?

उत्तर नाही.

प्र.२० तुम्हाला साक्षीदार तपासावयाचे आहेत काय ?

उत्तर नाही.

प्र.२१ तुम्हाला केसबद्दल आणखी काही सांगावयाचे आहे काय ?

उत्तर फिर्यादीला नांदायचे नसल्याने तिने आमच्या विरुद्ध खोटी केस दाखल केली आहे. आम्ही कोणताही गुन्हा केलेला नाही.

Nawdle.P.N

आरोपी

समक्ष

(डी.एम.हिंग्लजकर)

दिनांक – ०८.१२.२०२५ न्यायदंडाधिकारी प्र.वर्ग, अकोले

**प्रमाणपत्र**

वर नमुद आरोपीचा जबाब माझे समक्ष त्याच्या सांगणेप्रमाणे खरा व बरोबर नोंदविणेत आला आहे.

समक्ष

(डी.एम.हिंग्लजकर)

दिनांक – ०८.१२.२०२५ न्यायदंडाधिकारी प्र.वर्ग, अकोले